सं.के.नं.२६०/२०१९
नि.क्र. ४५/क च्या पुढे.

अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. १ याची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | - | महेश वासुदेव म्हात्रे |
| वय | - | ४६ वर्षे |
| व्यवसाय | - | खाजगी नोकरी |
| राहणार | - | नवीन शेवा, ता. उरण |

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती पवार यांच्याद्वारे...**

१. घटना ही दि. १७/११/२०१७ रोजी ॲपकॉन कंपनीमध्ये दुपारी ३.३० च्या सुमारास घडली होती. त्यावेळी मी ॲपकॉन कंपनीमध्ये नोकरीस होतो व माझा डयुटीचा कालावधी सकाळी ८.०० ते रात्री ८.०० असा होता. माझे काम साहेबांना चहापाणी देणे असे होते. घटनेच्या वेळी मी खोलीमध्ये बसलेलो होतो व दुपारी ३.३० च्या सुमारास रेडकर साहेबांना चहा देण्यासाठी आलो असता, तेथे विलास अनंत म्हात्रे याने मला चापट मारली व महेश अनंत म्हात्रे यांने मला खाली पाडून त्या दोघांनी लाथा ने मारहाण केली. त्या दोघांसोबत महेंद्र सुतार, भुपेंद्र पाटील, विजय घरत हे सुद्धा होते. तेथे कंपनीच्या कामासाठी रेडकर साहेबांना भेटण्यासाठी आलेले होते. त्यांचे रेडकर साहेबांसोबत भांडण व बाचाबाची चालू असताना, मी चहा देण्यासाठी गेलो असता, मला त्यांनी मारहाण केली. त्या सर्वांनी मला लाथांनी मारहाण केली. मला वाचविण्यास कोणीही आले नाहीत. रेडकर साहेब मला सोडविण्यास आले होते. मला शैलेश भोईर याने त्यानंतर दवाखान्यात नेले होते. ते शाखा प्रमुख आहेत. त्यांनी मला उरण येथील सरकारी दवाखान्यात नेले होते. तेथे माझी प्राथमिक तपासणी करुन वाशी येथील एम.जी.एम हॉस्पीटल येथे नेले. तेथे मी दोन दिवस भरती होतो. मी घटनेच्या दिवशी पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. आता मला ती फिर्याद दाखविली.

त्यावर माझी सही असून मजकूर खरा व बरोबर आहे, करीता फिर्यादला निशाणी क्र. P1/PW1 देण्यात येत आहे. ज्यांनी मला मारहाण केली होती ते आजरोजी न्यायालयात हजर आहेत.

<u>उलटतपास आरोपीच्या वतीने आरोपीचे वकील श्री.जितेंद्र कातरणे यांच्याव्दारे</u>

२. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझा जबाब घेतला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोलीमध्ये बसलो असताना दुपारी ३.३० च्या सुमारास साहेबांना चहा देण्यासाठी गेलो होतो हा मजकूर माझ्या फिर्यादमध्ये नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी फिर्याद मधील मजकूर वाचून त्यावर सही केली. मी पोलीसांना फिर्याद देतेवेळी खोली मध्ये बसलो असताना दुपारी ३.३० च्या सुमारास रेडकर साहेबांना चहा देण्यासाठी गेलो असल्याचे सांगितले नव्हते. तसेच मी फिर्याद देताना चहा देण्यासाठी गेलो असता रेडकर साहेब व आरोपी यांच्यात बाचाबाची सुरु होती हे सांगितले नव्हते.हे म्हणणे खरे नाही की, ॲपकॉन कंपनीही करार तत्वावर चालणारी कंपनी होती. घटनेच्या दिवशी मी डयुटीवर असल्याबाबत कोणताही दस्त पोलीसांना दिला नाही. त्या कंपनीमध्ये एका शिफ्ट मध्ये अंदाजे १००० कामगार काम करत होते. मी डयुटीवर हजर असल्याबाबत आमचे कार्यालयात रजिस्टरवर सही घेतली जात होती. त्या रजिस्टरची मागणी पोलीसांनी माझेकडे केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, विलास अनंत म्हात्रे याने मला चापट मारल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी महेंद्र याने मला खाली पाडल्याचे व सर्व आरोपींनी मिळून मला लाथांने मारल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी नविन शेवा येथील रहिवाशी आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी सुद्धा नविन शेवा येथील रहिवाशी आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आमचे गावामध्ये शिवसेना व शेतकरी कामगार पक्ष हे दोनच प्रमूख पक्ष आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आमचे गावात शिवसेनेचे जास्त कार्यकर्ते आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आमचे गावात शेतकरी

कामगार पक्षाचे सुद्धा जास्त कार्यकर्ते आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मी शिवसेना पक्षाचा कार्यकर्ता आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हे शेतकरी कामगार पक्षाचे कार्यकर्ते व पदाधीकारी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी विलास व महेंद्र यांचे घरात शेतकरी कामगार पक्षाचे सदस्य आहेत. हे म्हणणे खरे आहे की सन २०१७ मध्ये विलास याची पत्नी ग्रामपंचायत मध्ये शेतकरी कामगार पक्षाचे प्रतिनिधीत्व करत होती. हे म्हणणे खरे आहे की, शिवसेना व शेतकरी कामगार पक्ष यांच्यात राजकीय वयमनस्य आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे त्या दोनही पक्षाच्या कार्यकर्त्यां मध्ये छोटे मोठे वाद होत असतात. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१७ मध्ये नवीन न्हावाशेवा येथील शिवसेना पक्षाला पराभूत करुन शेतकरी कामगारपक्ष सत्तेत होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे माझा शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यां विरुद्ध राग होता. हे म्हणणे खरे नाही की, राजकीय वयमनस्यामुळे आरोपींविरुद्ध खोटी केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मला चापट मारल्याचे व लाथांनी मारहाण केल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासातील मजकूर खोटा सांगितलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितल्याप्रमाणे घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास नाही**

श्रवणोत्तर स्विकृत

सही/-

(एस.पी.वानखडे)
न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, उरण
(कोर्ट नं. २)

उरण,
दिनांक –११/११/२०२५